# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## मतदान केंद्रावरील मतदानासाठी उमेदवारांना सूचना

१. विद्यापीठाच्या अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यासमंडळे या अधिकार मंडळासाठी शिक्षक व नोंदणीकृत पदवीधर व महाविद्यालयीन विभागप्रमुख संवर्गानुसार निवडणूका दि.१४ नोव्हेंबर, २०२२ रोजी ३३ मतदान केंद्रांवर घेण्यात येणार आहेत.

२. मतदानाची वेळ सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत आहे. उमेदवार / प्रतिनिधी यांनी मतदान केंद्रावर सकाळी ठिक ८.३० वाजता हजर राहणेचे आहे.

३. केंद्राध्यक्षांकडून उमेदवार / प्रतिनिधी यांनी बॅजेस मागून घ्यावेत व त्याचा वापर करावा.

४. उमेदवारांनी प्रतिनिधी पाठविल्यास तसे लेखी अधिकार पत्र प्रतिनिधी यांना देणेचे आहे. उमेदवाराचे अधिकार पत्र असले शिवाय प्रतिनिधीस मतदान केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही.

५. रिकामी पेटी सकाळी ठिक ८.४५ वाजता सील करण्यास केंद्राध्यक्ष सुरूवात करतील. त्यावेळी उमेदवार / प्रतिनिधी यांनी हजर राहणेचे आहे. मतपेटी सील करताना उमेदवार / प्रतिनिधी यांनी त्यावर सही करणेची आहे. यावेळेत कोणताच उमेदवार / प्रतिनिधी हजर नसल्यास स्वत: केंद्राध्यक्ष आपल्या सहीने मतपेटी सील करतील.

६. मतदान केंद्रावर उमेदवार / प्रतिनिधी यांना प्रचार करण्यास किंवा मतदाराबरोबर चर्चा करण्यास सक्त मनाई आहे.

७. मतदानाची अंतिम वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत असलेने ठिक ४.५५ वाजता रांगेमध्ये काही मतदार असल्यास रांगेतील मतदारांना आपल्या सहीच्या चिट्ठ्या देतील. मतदारांना चिट्ठ्या देताना रांगेत जेवढे मतदार असतील तेवढ्या क्रमांकाच्या चिट्ठ्या करताना शेवटच्या मतदारास पहिल्या क्रमांकाची चिठ्ठी देऊन सुरूवात करावी.

८. मतदानाची वेळ संपल्यानंतर केंद्राध्यक्ष मतपेटी सील करण्यास घेतील. त्यावेळी उमेदवार / प्रतिनिधी यांनी हजर राहून सीलवर सही करावयाची आहे. यावेळेत कोणताच उमेदवार / प्रतिनिधी हजर नसल्यास स्वत: केंद्राध्यक्ष आपल्या सहीने सील करतील.

९. उमेदवार / प्रतिनिधी यांनी निवडणूक कामी मतदान केंद्रावर अडथळा होणार नाही, याची दक्षता घ्यावी. मतदान शांततेने पार पाडण्यास केंद्राध्यक्ष व त्यांच्या सहकाऱ्यांना सहकार्य करावे.

निवडणूक निर्णय अधिकारी
तथा प्रभारी कुलसचिव

Ele2022/information

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## मतदारांच्या माहितीकरिता

विद्यापीठ अधिकार मंडळांच्या निवडणूकीसंदर्भात दि.१७ मे, २०१७ रोजी प्रसिध्द झालेल्या एकरूप परिनियम ६ (१) मधील तरतुदीनुसार खालील कारणास्तव मतपत्रिका अवैध (Invalid) ठरविण्यात येतील.

क) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक '१' दर्शवण्यात आला नसेल

किंवा

ख) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक '१' एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर दर्शवण्यात आला असेल

किंवा

ग) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक '१' व काही अन्य अंक एकाच उमेदवाराच्या नावासमोर दर्शवण्यात आले असतील

किंवा

घ) प्रथम पसंतीक्रम किंवा त्यापुढील पसंतीक्रम, शब्दात किंवा रोमन अंकात किंवा इंग्रजी किंवा मराठी भाषा वगळून कोणत्याही अन्य भाषेच्या अंकात दर्शविण्यात आले असतील

किंवा

ङ) प्रथम पसंतीक्रम नोदवण्यात आलेला उमेदवार निर्धारित करता येत नसेल

किंवा

च) मतदाराने निवडणूकीमध्ये मतपत्रिकेवर जे नंतर ओळखता येईल असे कोणतेही चिन्ह नमूद केले असेल

किंवा

छ) निळया शाई खेरिज अन्य कोणत्याही शाईने पसंती दर्शवली असेल

ज) मतदारांची पसंती दर्शविणा-या अंकामध्ये कोणतीही खोडतोड, गिरवणे किंवा फेरफार केला असेल तर अशी मतपत्रिका अवैध ठरेल

**उपरोक्त बाबींची नोंद घेवून आपले बहुमूल्य मत अचूक नोंदवावे.**

**निवडणूक अधिकारी तथा**
**प्रभारी कुलसचिव**

## SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

**Statute 6 (1) published on 17th May, 2017 is reproduced below for the information to the Voters.**

**S. 6 (1): A Voting paper is invalid if :**

(*a*) the digit 1 standing alone, indicating a first preference, is not placed;

or

(*b*) the digit 1 standing alone, indicating a first preference, is placed opposite the names of more than one candidate;

or

(*c*) the digit 1 standing alone, indicating a first preference and some other digits are placed opposite the name of the same candidate;

or

(*d*) the first preference or subsequent preferences are indicated in words or roman numbers or in digits of any other language except English or Marathi;

or

(*e*) it cannot be determined for which candidate the first preference of the voter is recorded;

or

(*f*) in an election by ballot any mark is placed by the voter by which he may afterwards be identified;

or

(*g*) preference is indicated in any ink other than blue ink;

(*h*) there is any scratching, overwriting or alteration in the digits indicating the voter's preference.

# केंद्राध्यक्षांसाठी सूचना

मतदारांनी मतदानासाठी ओळखीकरिता खालीलपैकी कोणतेही कागदपत्र / पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

१. भारतीय / राज्य निवडणूक आयोगाने दिलेले ओळखपत्र

२. पासपोर्ट

३. वाहन चालविण्याचा परवाना

४. आयकर विभागाकडील पॅनकार्ड

५. केंद्र शासन / राज्य शासन / सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था (नगरपालिका /महानगरपालिका) यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना फोटोसहित दिलेले ओळखपत्र.

६. स्वातंत्र्य सैनिकाचे ओळखपत्र

७. समक्ष प्राधिकरणाने फोटोसहित दिलेला अपंगत्वाचा दाखला

८. फोटोसहित शस्त्रास्त्र परवाना

९.निवृत्त कर्मचाऱ्यांच्या विधवा / अवलंबित व्यक्ती यांचे फोटो असलेले शासकिय ओळखपत्र

१०.केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाने दिलेल्या आरोग्य विमा योजनेचे फोटोसहित कार्ड

११.आधारकार्ड

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना सूचना

विद्यापीठाच्या अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यासमंडळे या अधिकार मंडळासाठी शिक्षक व नोंदणीकृत पदवीधर व महाविद्यालयीन विभागप्रमुख संवर्गानुसार निवडणूका दि.१४ नोव्हेंबर, २०२२ रोजी ३३ मतदान केंद्रांवर घेण्यात येणार आहेत. तेव्हा मतदानासाठी आलेल्या मतदाराच्या बोटाला शाईची खूण खालीलप्रमाणे लावण्यात यावी.

१. अधिसभा व विद्यापरिषद शिक्षकांसाठी आलेल्या मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीला पक्क्या शाईची खूण करण्यात यावी.

२. नोंदणीकृत पदवीधरसाठी आलेल्या मतदाराच्या डाव्या हाताच्या करंगळीला पक्क्या शाईची खूण करण्यात यावी.

३. अभ्यास मंडळासाठी आलेल्या मतदाराच्या डाव्या हाताच्या अनामिकेला पक्क्या शाईची खूण करण्यात यावी.

निवडणूक निर्णय अधिकारी
तथा प्रभारी कुलसचिव